# विभाग 2 : मराठी (कुमारभारती)

**अत्यंत महत्त्वाचे**

**नोंद : शैक्षणिक वर्ष 2020 – 21 करिता होणाऱ्या मूल्यमापनातून पुढील पाठ वगळण्यात आले आहेत :**

**गद्य पाठ :** (५) वसंतहृदय चैत्र (१७) सोनाली

(१४) काळे केस (१८) निर्णय

**स्थूलवाचन :** ● मनक्या पेरेन लागा

● वगळण्यात आलेल्या वरील पाठांना जोडून असलेले व्याकरणाचे कोणतेही घटक, कृती (व्याकरणाची उजळणी व नवीन व्याकरण) तसेच इतर भाषिक कृती (उपयोजित लेखन) इत्यादी वगळण्यात आलेले नाहीत.

**बोर्डाच्या मार्च 2020 च्या कृतिपत्रिकेत या पाठांतील प्रश्नांना छायांकित करण्यात आले आहे.**

**सदर सराव कृतिपत्रिका वगळलेले पाठ लक्षात घेऊनच तयार करण्यात आल्या आहेत.**

## बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेचा अद्ययावत आराखडा
## (मार्गदर्शन व स्पष्टीकरणांसह)

## विभाग 1 : गद्य

### पठित गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** 7

**लक्षात ठेवा :** पाठ्यपुस्तकातील गद्यपाठांतून 130 ते 150 शब्दांचा एक उतारा दिला जाईल. त्यावर प्रत्येकी 2 गुणांच्या 2 व 3 गुणांची 1 अशा तीन कृती दिल्या जातील. काही वेळा 2 गुणांच्या कृतींमध्ये 1–1 गुणाच्या दोन लहान लहान कृतीही विचारल्या जाऊ शकतात.

**कृती 1 व 2 : (आकलन) (प्रत्येकी 2 गुण)**

**लक्षात ठेवा :**
- ■ या आशयाच्या आकलनावर व उपयोजनावर आधारित असतील. या कृती वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या असतील.
- ■ प्रत्येक वेळी विचारलेली कृती ठरावीक प्रकारचीच असेल असे नाही.

  नमुन्यादाखल आणखी काही कृती पाहा :

  (1) आकृतिबंध पूर्ण करा.
  (2) कोष्टक / तक्ता / यादी.
  (3) घटनाक्रमानुसार क्रम लावा.
  (4) सहसंबंधांनुसार लिहा.
  (5) सहसंबंध लक्षात घेऊन वाक्यांचा क्रम लावा.
  (6) सहसंबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा.
  (7) ओघतक्ता पूर्ण करा.
  (8) सहसंबंध लक्षात घेऊन योग्य विधान निवडा.
  (9) जोड्या लावा.
  (10) गाळलेल्या जागा भरा.
  (11) विधान पूर्ण करा.
- ■ या कृतीचे उत्तर बहुधा एक-दोन शब्दांत लिहावे लागेल. क्वचित प्रसंगी ते अधिक शब्दांत किंवा पूर्ण वाक्यातही लिहिणे अपेक्षित असेल.
- ■ कृतीचे उत्तर जसेच्या तसे उताऱ्यातच असेल असे नाही. काही वेळा स्वत:च्या शब्दांतही उत्तर लिहावे लागेल.

**कृती 3 :** **(स्वमत) (3 गुण)**

**लक्षात ठेवा :** ■ येथे स्वत:च्या शब्दांत स्वत:चे मत मांडण्यावर भर आहे. हा मुक्तोत्तरी स्वरूपाचा प्रश्न असेल.

■ **या कृतीत स्वमत प्रकट करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रश्न विचारले जाऊ शकतात :**

(1) दिलेल्या उताऱ्यातील विचार स्पष्ट करून सांगा.

(2) दिलेल्या उताऱ्यातील विचार आजच्या परिस्थितीत लागू पडतो का, हे समजावून सांगा.

(3) दिलेल्या उताऱ्यातील विचाराला अनुसरून स्वत:ची जबाबदारी समजावून सांगा.

(4) दिलेल्या उताऱ्यातील विचारासंबंधात तुमचे स्वत:चे मत थोडक्यात मांडा.

(5) पाठातील एका घटकाचे आत्मकथन लिहा.

(6) पाठातील विशिष्ट मजकूर संवादरूपात लिहा.

(7) तुमच्या जीवनातील एखादा अविस्मरणीय प्रसंग लिहा.

(8) पाठ्यपुस्तकातील कथेचा शेवट बदलून लिहा.

(9) दिलेल्या उताऱ्याच्या अनुषंगाने आवडणारा सण / महिना / ऋतू / उत्सव / प्राणी / वनस्पती / फूल / फळ / वस्तू वगैरे.

(10) उताऱ्याला अनुसरून स्वत: अनुभवलेला एखादा प्रसंग लिहा.

(11) वरील प्रकारचे प्रश्न संपूर्ण पाठाच्या आशयावरही विचारले जाऊ शकतात.

अशा प्रकारचे आणखी विविध प्रश्न विचारले जाऊ शकतात.

## प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : 7

**टीप : प्रश्न 1 (आ)** मध्ये प्रश्न 1 (अ) प्रमाणेच 130 ते 150 शब्दांचा उतारा व त्या आधारित कृती विचारल्या जातात. अर्थात यामध्येही कृती 1 व 2 — आकलन कृती आणि कृती 3 — स्वमत कृती असते. तेव्हा या प्रश्नाच्या स्पष्टीकरणासाठी प्रश्न 1 (अ) मध्ये दिलेले स्पष्टीकरण पाहा.

# अपठित गद्य

## प्र. 1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : 4

**कृती 1 व 2 :** **(आकलन) (प्रत्येकी 2 गुण)**

**लक्षात ठेवा :** ■ **प्रश्न 1 (इ)** यासाठी 80 ते 100 शब्दांचा एक अपठित उतारा दिला जाईल. यावरील आकलनाच्या दोन कृती या प्र. 1 (अ) व (आ) मधील आकलन कृतीनुसार असतील. स्पष्टीकरणासाठी प्र. 1 (अ) कृती 1 साठी दिलेले मार्गदर्शन पाहा.

■ या प्रश्नात दिलेला अपठित उतारा उपयोजित लेखनामधील प्रश्न 5 (अ) (2) मध्ये दिल्या जाणाऱ्या सारांशलेखनाच्या प्रश्नासाठीसुद्धा तोच राहील, हे लक्षात घ्यावे.

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **8**

**कृती 1 ते 4 :** **(प्रत्येकी 2 गुण)**

**लक्षात ठेवा :** ■ या कृतीसाठी पाठ्यपुस्तकातील एक कविता दिली जाईल.

■ दिलेल्या कवितेवर पुढीलप्रमाणे कृती 1 ते कृती 4 या प्रत्येकी 2 गुणांच्या कृती विचारल्या जातील.

**कृती 1 व 2 : (आकलन) (प्रत्येकी 2 गुण)**

या कृती आशयाच्या आकलनावर व उपयोजनावर आधारित असतील.

**कृती 3 : (काव्यपंक्तींचा सरळ अर्थ) (2 गुण)**

या कृतीमध्ये कवितेतील दिलेल्या कोणत्याही दोन/चार ओळींचा सरळ अर्थ विचारला जाईल.

**कृती 4 : (काव्यसौंदर्य) (2 गुण)**

ही कृती काव्यसौंदर्यावर आधारित असेल. यामध्ये विचारसौंदर्य, भावसौंदर्य व अर्थसौंदर्य या तीन घटकांपैकी कोणत्याही एका घटकावर कृती विचारली जाईल.

**प्र. 2. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही एका* कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील कृती सोडवा :** **4**

**लक्षात ठेवा :** ■ प्रश्न 2 (अ) मध्ये दिलेली पठित कविता सोडून पाठ्यपुस्तकातील इतर कोणत्याही दोन कवितांची नावे दिली जातील. त्यांपैकी कोणत्याही एका कवितेवर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती करणे अपेक्षित आहे. पुढील कृतींपैकी चार गुणांसाठी कोणत्याही कृती विचारल्या जातील. यामध्ये 1-1 गुणाच्या 2 कृती व 2 गुणांची 1 कृती किंवा 2 गुणांच्या 2 कृती असतील.

(i) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – 1 गुण

(ii) प्रस्तुत कवितेचा विषय – 1 गुण

(iii) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा – 2 गुण
(कवितेतील कोणतेही दोन शब्द दिले जातील.
दोन्ही सोडवणे अपेक्षित.)

(iv) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश – 2 गुण

(v) प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा – 2 गुण

(vi) कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा – 2 गुण

(vii) कवितेतील दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा – 2 गुण

(viii) प्रस्तुत कविता तुम्हांला आवडण्याचे वा
न आवडण्याचे कारण लिहा – 2 गुण

## प्र. 2. (इ) पुढील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा : 4

**लक्षात ठेवा :**
- प्रश्न 2 (अ) मध्ये दिलेली कविता आणि प्रश्न 2 (आ) (1) मध्ये उल्लेखलेल्या दोन कविता सोडून पाठ्यपुस्तकातील अन्य कवितांपैकी एका कवितेवर आधारित हा प्रश्न असेल.
- कृतिपत्रिकेतील **प्रश्न 2 (आ) (2)** हा कवितेच्या पंक्तींच्या **रसग्रहणावर** आधारित प्रश्न आहे. कृतिपत्रिकेत **4 गुणांचा** हा नवीन प्रश्नप्रकार असून, त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल :
- पठित पद्यांपैकी म्हणजेच पाठ्यपुस्तकातील कोणत्याही एका कवितेपैकी रसग्रहणास अनुकूल अशा कोणत्याही **दोन/तीन/चार पंक्ती** देऊन, त्यांचे **रसग्रहण करा** असा प्रश्न विचारला जाईल.
- दिलेल्या पंक्तींचे रसग्रहण करताना पुढील तीन मुद्द्यांना अनुसरून तीन परिच्छेदांत रसग्रहण करणे अपेक्षित आहे :

  **(1) आशयसौंदर्य :** यामध्ये कवीचे/कवितेचे नाव, कवितेचा विषय, मध्यवर्ती कल्पना, संदेश, उपदेश, मूल्य, कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव आदी मुद्द्यांना धरून माहिती लिहावी. प्रत्येक कवितेतील कोणत्याही दोन पंक्तींसाठी हे मुद्दे सर्वसाधारणपणे सारखेच राहतील.

  **(2) काव्यसौंदर्य :** यामध्ये दिलेल्या पंक्तींतील अर्थालंकार, रस, विविध कल्पना, प्रतिमा, विविध भावना यांविषयी लिहावे. ही माहिती दिलेल्या पंक्तींना अनुसरून लिहावी लागणार आहे. त्यासाठी कवितेचा भावार्थ बारकाईने अभ्यासावा.

  **(3) भाषिक वैशिष्ट्ये :** यामध्ये कवीची भाषाशैली कोणत्या प्रकारची आहे (ग्रामीण, बोलीभाषा, संवादात्मक, निवेदनात्मक, चित्रदर्शी यांपैकी कोणती), आंतरिक लय, नादमाधुर्य, अलंकार आदी मुद्द्यांना धरून माहिती यावी. हे मुद्देही प्रत्येक कवितेतील कोणत्याही पंक्तींसाठी साधारणपणे सारखेच असतील.

# विभाग 3 : स्थूलवाचन

## प्र. 3. पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा : 6

**कृती 1 व 2 : (स्वमत/अभिव्यक्ती)**

**लक्षात ठेवा :**
- यामध्ये स्वमत/अभिव्यक्ती कृती अपेक्षित आहे.
- पाठाचा आशय, शालाबाह्य जीवनाशी सांगड घालणारा आशय, मूल्य, जीवनकौशल्ये यांवर आधारित कृती विचारली जाईल.
- दिलेल्या मुद्द्यांवरून टिपा लिहायला सांगितल्या जातील. (संबंधित पाठातीलच मुद्दे असतील.)
- पाठातील संदेश, विचार, मूल्य किंवा एकंदरीत आशय यांच्या आधाराने कृतीची रचना केलेली असेल.
- 3 कृती दिल्या जातील. त्यांपैकी 2 सोडवणे अपेक्षित. (प्रत्येकी 3 गुण)

# विभाग 4 : भाषाभ्यास

## प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती : 8

**लक्षात ठेवा :** ■ पाठ्यपुस्तकातील 'भाषाभ्यास' या शीर्षकाखाली आलेल्या व्याकरण घटकांवर आधारित पुढीलप्रमाणे कृती विचारल्या जातील :

**(1) समास : (2 गुण)**

(i) सामासिक शब्द व समासाचे नाव यांच्या जोड्या लावा.

(ii) सामासिक शब्दांचा विग्रह व समासाचे नाव लिहा.

(iii) विग्रहावरून सामासिक शब्द लिहा.

(iv) समासाच्या नावावरून सामासिक शब्द लिहा इत्यादी.

**(2) शब्दसिद्धी : (2 गुण)**

(i) प्रत्यय लावून शब्द तयार करा.

(ii) उपसर्ग लावून शब्द तयार करा.

(iii) दिलेल्या उदाहरणानुसार अभ्यस्त शब्द लिहा.

**(3) वाक्प्रचार : (4 गुण)**

दिलेल्या 4 वाक्प्रचारांपैकी 2 वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यांत उपयोग करा.

## प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती : 8

**लक्षात ठेवा :** ■ पाठ्यपुस्तकातील स्वाध्यायांत आलेल्या भाषिक घटकांवर आधारित पुढीलप्रमाणे कृती देण्यात येतील :

**(1) शब्दसंपत्ती : (4 गुण)**

(i) समानार्थी शब्द लिहा.

(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.

(iii) एकवचन/अनेकवचन लिहा/ओळखा.

(iv) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.

(v) शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

→ 5 पैकी कोणत्याही चार कृती विचारण्यात येतील. **(प्रत्येकी 1 गुण)**

**(2) लेखननियमांनुसार लेखन : (2 गुण)**

(i) अचूक शब्द ओळखा.

(ii) लेखननियमांनुसार वाक्य लिहा.

**(3) विरामचिन्हे : (1 गुण)**

(i) योग्य विरामचिन्हे वापरा.

(ii) विरामचिन्हे ओळखा.

(iii) चुकीची विरामचिन्हे बदला.

**(4) पारिभाषिक शब्द : (1 गुण)**

गद्य व पद्य घटकांवर आधारित इंग्रजी पारिभाषिक शब्दांचे मराठी प्रतिशब्द लिहा.

## विभाग 5 : उपयोजित लेखन

### प्र. 5. (अ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा : 6

**लक्षात ठेवा :** ■ पुढील कृती उपयोजित लेखनातील पत्रलेखन व सारांशलेखनावर आधारित असेल. मात्र पत्रलेखन या कृतीला सारांशलेखन ही कृती वैकल्पिक आहे.

■ **प्रश्न 5 (अ) (1)** मध्ये पत्रलेखनात मागणी/विनंती/कौटुंबिक या पत्रांपैकी एक औपचारिक व एक अनौपचारिक किंवा दोन्ही औपचारिक असे दोन प्रकारचे पत्र-विषय कृतिस्वरूपात दिले जातील. त्यांपैकी कोणत्याही एका प्रकारचे पत्र लिहायचे आहे. ***किंवा***

■ **प्रश्न 5 (अ) (2)** मध्ये सारांशलेखनासाठी विभाग 1 : गद्य – प्रश्न 1 (इ) मधील अपठित उताऱ्याचा $\frac{1}{3}$ एवढा सारांश लिहिण्यास दिला जाईल.

### प्र. 5. (आ) पुढीलपैकी *कोणत्याही दोन* कृती सोडवा : 10

**लक्षात ठेवा :** ■ **प्रश्न 5 (आ)** मध्ये (1) जाहिरातलेखन (2) बातमीलेखन आणि (3) कथालेखन हे तिन्ही लेखनप्रकार परीक्षेत विचारण्यात येतील आणि त्यांपैकी कोणतेही दोन सोडवणे अनिवार्य असेल.

**(1) जाहिरातलेखन :** 5

**लक्षात ठेवा :** ■ जाहिरातीचा प्रश्न कृतीयुक्त स्वरूपात दिला जाईल. त्यासाठी प्रसंग, चित्र, बातमी, शैक्षणिक विषय यांपैकी कोणत्याही स्वरूपात विषय दिला जाईल.

■ जाहिरात लिहिताना दिलेल्या कृतीतील सर्व मुद्द्यांचा विचार करावा.

■ चित्र किंवा सजावट अनिवार्य नाही. शब्दरूप महत्त्वाचे असते.

■ जाहिरातलेखनासाठी पुढीलपैकी कोणत्याही प्रकारची कृती दिली जाईल :

(1) शब्दांवरून जाहिरातलेखन.

(2) जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवा.

(3) विषय देऊन जाहिरातलेखन.

(4) दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन.

(5) कलात्मक, सर्जनशील रितीने तयार केलेल्या अन्य कोणत्याही कृतीआधारे जाहिरातलेखन.

■ शब्दमर्यादा 50 ते 60.

**(2) बातमीलेखन :** 5

**लक्षात ठेवा :** ■ कृतिपत्रिकेत एखाद्या घटना-प्रसंगाची किंवा एखाद्या समारंभाची माहिती देऊन त्याआधारे बातमीलेखन करण्यास सांगितले जाईल.

■ शाळेत, परिसरात साजरे झालेले कार्यक्रम (**उदा.**, मराठी भाषादिन, स्नेहसंमेलन, शालेय घडामोडी, वृक्षारोपण, सहल, आपत्ती व्यवस्थापन) वगैरेंची माहिती देऊन बातमीलेखनासाठी मुद्दे दिले जातील. बातमीलेखनासाठी मुद्दे हे शब्द किंवा चित्रे यांच्या साहाय्याने दिले जातील.

■ शब्दमर्यादा 50 ते 60.

**(3) कथालेखन :** 5

> **लक्षात ठेवा :** ■ पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकाराने कथालेखन करण्यास सांगितले जाईल :
> (1) कथाबीजावरून कथा लिहा.
> (2) मुद्द्यांवरून कथा लिहा.
> (3) दिलेल्या शब्दांवरून कथा लिहा.
> (4) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहा किंवा उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहा.
> (5) वरीलपेक्षा वेगळ्या, सर्जनशील पद्धतीनेही कथालेखनाची कृती दिली जाऊ शकते.
> ■ शब्दमर्यादा 80 ते 100.

## प्र. 5. (इ) लेखनकौशल्य :

• **पुढील लेखनप्रकारांपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा : (शब्दमर्यादा 100 ते 120)** 8

> **लक्षात ठेवा :** ■ **प्रश्न 5 (इ)** मध्ये (1) प्रसंगलेखन (2) आत्मकथन (3) वैचारिक लेखन या तीन कृतींपैकी कोणतीही एक कृती सोडवायची आहे.

**(1) प्रसंगलेखन :**

> **लक्षात ठेवा :** ■ कृतिपत्रिकेतील **प्रश्न 5 (इ)** मध्ये 'प्रसंगलेखन' या लेखनप्रकारावर कृती विचारली जाईल.
> ■ विद्यार्थ्यांच्या अनुभवविश्वाला परिचित असा प्रसंग देऊन त्याचे वर्णन करण्यास सांगितले जाईल. किंवा चित्र देऊन त्याआधारे वर्णन करण्यासही सांगितले जाईल.
> ■ पाहिलेल्या/ऐकलेल्या/अनुभवलेल्या प्रसंगाचे वर्णन लिहिणे अपेक्षित.

**(2) आत्मकथन :**

> **लक्षात ठेवा :** ■ कृतिपत्रिकेतील **प्रश्न 5 (इ)** मध्ये 'आत्मकथन' या लेखनप्रकारावर कृती विचारली जाईल.
> ■ या कृतीसाठी एखादे चित्र दिले जाईल आणि त्या चित्रातला घटक तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहायला सांगितले जाईल. ***किंवा***
> ■ एखादा प्रसंग किंवा दृश्य देऊन त्यातला एखादा घटक तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहायला सांगितले जाईल. ***किंवा***
> ■ एखादे चित्र दिले जाईल. त्या चित्रातील कोणता तरी एक घटक चित्रातल्या अन्य घटकांशी बोलत आहे, अशा आशयाचे चित्र दिले जाईल. बोलणारा घटक काय बोलत असेल, याची कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहिण्यास सांगितले जाईल.
> ■ आत्मकथनाचा विषय विद्यार्थ्यांच्या परिचित अनुभवविश्वातलाच असेल.

**(3) वैचारिक लेखन :**

> **लक्षात ठेवा :** ■ कृतिपत्रिकेतील **प्रश्न 5 (इ)** मध्ये 'वैचारिक लेखन' या लेखनप्रकारावर कृती विचारली जाईल.
> ■ साधारणपणे, चित्राकृतीच्या स्वरूपात विषय दिला जाईल.
> ■ चित्रातले लहान लहान चित्रघटक म्हणजे एक प्रकारे लेखनासाठी दिलेले मुद्देच होत.
> ■ लेखनात हे मुद्दे कोणत्या क्रमाने यावेत, कोणत्या मुद्द्याला किती महत्त्व द्यावे हे चित्रावरून सहजपणे कळणार नाही.
> ■ त्यामुळे विद्यार्थ्याला मुक्तपणे लेखन करण्याची संधी मिळते.
> ■ विद्यार्थ्यांनी स्वत:चे विचार स्वत:च्या शब्दांत मांडावेत, अशी अपेक्षा असते.